## ४.अ) अपात्र व अस्वीकृत अर्जासंबंधीची कार्यवाही

४.अ.१) विशिष्ट कारणांमुळे परीक्षार्थी अपात्र ठरत असल्यास तशी सूचना लाल रंगात दर्शविली जाईल. असे परीक्षार्थी परीक्षेसाठी अपात्र ठरणार असल्याने त्यांनी सदर माहितीची खातरजमा करुन अर्ज भरावा. संगणकाने स्वीकारलेल्या अर्जानुसार काही कारणामुळे परीक्षार्थी अपात्र ठरत असल्यास संबंधित कारणे online नमूद होतील. त्यानंतर परीक्षार्थीने खालील ४.अ.२ मधील सूचनेप्रमाणे कार्यवाही करावी.,

४.अ.२) Online प्रणालीमध्ये अपात्र दर्शविलेल्या परीक्षार्थींना त्यांच्या अर्जाबाबत आक्षेप वेळापत्रकाप्रमाणे online नोंदवावे लागतील. online अर्जाची प्रत व आक्षेपांतर्गत बाबींच्या संबंधाने सादर करावयाच्या कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती व मूळ कागदपत्रांसह उपस्थित राहून आपले लेखी निवेदनही संबंधित गटशिक्षणाधिकारी/जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/ शिक्षण निरीक्षक, मुंबई (प.,उ.,द.) यांचेकडे समक्ष नोंदवावे लागेल.

४.अ.३) **या संदर्भात संकेतस्थळावर दिलेल्या वेळापत्रकातील मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही.**

४.अ.४) शिक्षणाधिकारी (प्राथमिक) / शिक्षण निरीक्षक, मुंबई (प.,उ.,द.) / गटशिक्षणाधिकारी यांनी अपात्र अर्जासंबंधीचे आक्षेप पूर्तता अर्जाची व अस्वीकृत अर्जासंबंधीचे निवेदनासाठी स्वतंत्र नोंदवही ठेवावी.

४.अ.५) अपात्र अर्जासंबंधीचे आक्षेप पूर्तता असणारे प्राप्त अर्ज व अस्वीकृत (२.३६ प्रमाणे) अर्जासंबंधीचे निवेदन यांची यादी करून हे सर्व अर्ज शिक्षणाधिकारी (प्राथमिक) / शिक्षण निरीक्षक, मुंबई (प.,उ.,द.) यांचेकडे संकेतस्थळावर दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे कार्यालयीन वेळेत जमा करावेत व पोहोच घ्यावी.